









REIKI VIDYA NIKETAN

सर्वे: सन्तु निरामया:

# रेकि ब्रह्म

वर्ष ९वे अंक ७वा । एप्रिल २०२१





संपादकिय

# अक्कलकोट स्वामींची पालखी निघाली

१५ मार्च २०२१ रोजी आपल्या देवरूख मठाला २१ वर्षे पूर्ण झाली. पाहता पाहता हा २१ वर्षांचा काळ कसा पसार झाला कळले सुद्धा नाही. २१ हा अंक अध्यात्माच्या क्षेत्रात फारच महत्वाचा आणि आपल्या साधनेमध्ये तर २१ दिवस म्हणजे उपचारांचा काळ कि ज्यानंतर रुग्णाला आराम वाटू लागतो. त्याच्या स्थितीत परिवर्तन होते. मठाच्या २१ वर्षांच्या या वाटचालीत किती साधकांची आयुष्ये परिवर्तित झाली याची कोणी मोजणी केली का नाही हे मला माहित नाही. परंतु कोठेतरी मनाच्या अंतरंगात अगदी गाजलेले भजन “नाही पुण्याची मोजणी, नाही पापाची टोचणी” हे गाणे पुन्हा पुन्हा फेर धरू लागले. २१ वर्षांची ही वाटचाल “जिणे गंगौघाचे पाणी” या वाक्याच्या भावाप्रमाणे झाली एवढे मात्र निश्चित्.

हा दिवस उजाडला आणि अचानक् २१ वर्षांतील एकेक घटना नजरेसमोरून एखाद्या चित्रपटासारखी सरकू लागली. लहानपणापासून मनात जपलेली एक कविता ज्याच्या निर्मात्याचे नाव-गाव मला माहीत







नाही, या क्षणाला माझ्या मनासमोर रूंजी घालते आहे कारण या क्षणाला माझ्या भावना त्याच आहेत...

अताशा असे हे काय मला होते?
कुण्या काळचे पाणी डोळ्यात येते।
बरा बोलता बोलता स्तब्ध होतो,
कशी शांतता शून्य शब्दांतून येते ॥१॥

कधी ऐकू येतो क्षणांचा इशारा,
क्षणी व्यर्थ होतो दिशांचा पसारा ।
नभातून ज्या रोज जातो बुडोनी,
नभाशीच त्यामागु जातो किनारा ॥२॥

न अंदाज कुठले, न अवधान काही,
कुठे जायचे, यायचे भान नाही ।
जसा गंध निघतो हवेच्या प्रवासा,
न कुठले नकाशे, न अनुमान काही ॥३॥

कशी ही अवस्था कुणाला कळावे?
कुणाला पुसावे? कुणी उत्तरावे?
किती खेळ जातो, तरी तोल जातो,
असा तोल जाता कुणी सावरावे?॥४॥

आज माझी अवस्था फारशी वेगळी नाही. गेली २१ वर्षे वाहीलेल्या ह्या श्री स्वामी समर्थांच्या पालखीत किती निशाणवाले बदलले, किती लोकांनी चवऱ्या ढाळल्या, किती मशालधारी मशालीसारखेच तेल संपताच काळाच्या उदरात गडप झाले, किती गायक– गायिकांनी आर्तपणाने स्वामींची भजने गात गात सुरावटीमध्ये स्वत:ला मिसळून टाकले.. परंतु पालखी मात्र चालतच राहीली. प्रत्येक टप्प्याला नवे सहकारी नव्या दमाने, नव्या उमेदीने येत राहीले. लोकांचे प्रेम आणि श्रद्धा त्यांनी ओसंडून दिले. त्या प्रेमाची, स्नेहाची मोजणी कोठे करायची? गंगौघाच्या या प्रवाहात मनात नसताना सुद्धा किती लोकांच्या डोळ्यांत पाणी उडाले, जगन्नाथाचा हा रथ ओढताना किती साधक अनाहुतपणे दुखावले गेले या पापाची टोचणी तरी कशी सांभाळावी? हे सगळेच अतर्क्य. हे सगळेच सहन करणे तसे कठीण होते असे आता वाटायला लागले आहे. परंतु स्वामींनी हात धरून प्रत्येक प्रसंगातून हलकेच बाहेर काढले. चारही बाजूला अथांग सागराचे तुफान आणि कोठेही नावाडयाचे किंवा बोटीचेही नामोनिशाण नसताना, ते परात्पर गुरू, ते अनंतकोटी ब्रह्मांडांचे नायक, लाटेच्या स्वरूपात येऊन त्यांनी मला सुखरूप किनाऱ्यावर आणले. स्वामींचे हे अलौकिक प्रेम माझ्या वाटयाला का आले असेल? माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या दुबळ्या खांद्यांवर आपली पालखी स्वार करण्याचे स्वामींनी का योजले असेल? एका बाजूला स्वामींचे अलोट प्रेम आणि कृपाशिर्वाद आणि दुसऱ्या बाजूला माझ्यावर अतीव प्रेम व श्रद्धा ठेवणारे असंख्य साधक.. का करतात लोक एवढे प्रेम, का करतात स्वामी एवढी कृपा? नाही पुण्याची मोजणी.. हेच खरे.

मठाच्या सुरूवातीच्या काळात मठात वीज नव्हती. पण तरीही स्वामींनी प्रकाश कधी लोपू दिला नाही, मठाच्या प्रांगणावर छप्पर नव्हते. पण प्रत्यक्ष स्वामींच्या आशिर्वादाचे छप्पर नभाच्याच रूपाने मठावर पसरले होते. काहीच नव्हते पण कशाचीच कमी नव्हती, सुबत्ता नव्हती पण कशाचीच उणीव नव्हती. घनदाट, जंगलातसुद्धा भीतिची एक लहरही उमटू दिली नाही स्वामींनी. पालखी चालताना पायाखालचे तीव्र टोकदार कोच (गवत) सुद्धा पायाला टोचू दिले नाहीत स्वामींनी. रात्रीच्या काळोखात पौर्णिमेचा चंद्रमा साथीला पाठवला स्वामींनी. साधकांनी मग स्वकष्टाने छत्र पुरवले, स्वप्रयत्नाने मठात वीज आणली.

**आता स्वप्न एवढेच जोपासायचे कि जे काही ना काही कारणास्तव पालखीतून बाजूला झाले त्यांनी पुन्हा ह्या पालखी सोहळ्यात येऊन काही काळासाठी का होईना स्वामींच्या पालखीचे भोई बनायचे. या, स्वामी वाट पाहत आहेत तुमची. पालखी चालूच राहू द्या.**

**अजित सर**
दि, १५ मार्च २०२१





(भाग ४१वा)

# तेलंग स्वामी

## एक अद्भुत अस्तित्व

अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक

उमाचरणजींनी आसामला नोकरीचा अर्ज पाठवून दिला. तिथून बोलावणे येताच मुंगेरच्या मालकाने पगार वाढवून दिला. परंतु गुरुदेवांची आज्ञा होती त्याप्रमाणे उमाचरणजी आसामला गेले. तिथे गोलाघाट येथे काम करीत असताना त्यांचा एका तरूणाशी परिचय झाला. गप्पा मारताना त्यांना लक्षात आले की त्याची सासुरवाडी म्हणजे उमाचरणाजींचे पूर्व जन्मातील घराणे. सासरची मंडळी त्याच घरात रहात होती. उमाचरणजींना आठवले की तेव्हा घराच्या दक्षिण दरवाजाच्या वर एक संस्कृत श्लोक लिहिलेला होता. तो अजूनही तसाच आहे का हे जाणून घेण्यास ते उत्सुक होते. त्यांनी त्या तरूणाला तसे सांगताच तो म्हणाला, “मुखर्जी साहेब, मला एकुण दोनशे रुपये पगार मिळतो. घरी जाण्या–येण्यात माझा महिनाभराचा पगार संपून जाईल. आपण पत्र टाकून विचारून घेऊ या.”

उमाचरणजींना ते पटले. त्याने सासऱ्यांना पत्र लिहीले ते असे –“आम्ही आपल्याकडे येणार होतो. पण काम खूप असल्याने येऊ शकत नाही. आपल्याला जरा कष्ट देतो आहे. आपण हे काम केल्यास खूप ऋणी राहीन. तुमच्या घराच्या दक्षिण दिशेच्या दरवाजावर बरेचसे संस्कृत श्लोक लिहिले आहेत. ते लिहून पाठवलेत तर बरे होईल. वेळ होईल तेव्हा भेटण्यास येईनच.”

काही दिवसातच त्यांचे उत्तर आले व त्यात त्यांनी तीन श्लोक लिहून पाठवले.

**१ वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गृण्हाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि**
**संयाति नवानि देही ॥**

**२. रुचीनां वैचित्र्यादृजु कुटील नाना पथजुषाम ।**
**नृणमेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥**

**३. निर्मयस्या प्रेमयस्य निष्कलस्या शरिरिणः ।**
**साधकानां हितार्थाय ब्रम्हणो रुप कल्पना ॥**

अर्थात –

**१. माणूस जसा जुने वस्त्र टाकून नवीन वस्त्र धारण करतो, तसाच देह धारण करणारा जीवसुध्दा जुने शरीर टाकून नवीन शरीराचा आश्रय घेतो.**

**२. अनेक मर्गांनी प्रवाहित होऊनही सर्व नद्या जशा शेवटी सागरातच विलीन होतात तसेच माणसांच्या प्रवृत्ति व उपासनेचे मार्ग वेगवेगळे असले तरी प्रत्येकाचे उद्दिष्ट्य एकच असते – ब्रम्हप्राप्ति.**

**३. ब्रम्ह हे तत्व अहंकार रहित, परिणाम शून्य, अतिशय शुध्द व अशरीर असून सुध्दा साधकांकरिता विविध रूपात भासमान होत असते.**

श्लोक मिळताच उमाचरणजींना खुप आनंद झाला. गुरुदेव पदोपदी मदत करीत असल्याचा त्यांना प्रत्यय आला.

इ.स. १८८७ मध्ये एक दिवस त्यांना काशीहून गुरुदेवांचे एक पत्र आले–

"एक महिन्यानंतर शरीराचा त्याग करणार आहे. सर्व शिष्य व सेवकांना हे सांगितले आहे. तुला पण सूचित करीत आहे. अर्ज करताच तुला रजा मिळेल तेव्हा अवश्य यावे."

काशीला येताच उमाचरणजींना समजले की गुरुजींनी जो दिवस प्रयाणाकरिता निश्चित केला आहे त्याला केवळ दहाच दिवस उरले आहेत. कालीचरण स्वामी, सदानंद स्वामी, भोलानंद स्वामी, दोन परमहंस, मंगलदास – असे स्वामीजींचे प्रमुख शिष्य व इतर अनेक स्थानिक शिष्यही तेथे जमले होते.

समाधी घ्यायच्या काही दिवस आधी स्वामीजींनी आदेश दिला, "माझ्या मापाचा एक खोका तयार करून घ्या. मला त्यात आडवे झोपवा. झाकण बंद करून कुलूप लावा व पंचगंगेत एका विशिष्ट ठिकाणी हा खोका सोडून द्या."

आदल्या दिवशीपर्यंत स्वामीजी उपदेश करीत होते. ते स्वतः अतिशय प्रसन्न होते परंतु जमलेले लोक उदास दिसत होते.

देहत्याग करण्याच्या एक दिवस आधी त्यांनी सूचना दिली, "उद्या एक नाव किनाऱ्यावर तयार ठेवा. देहत्यागानंतर खोका त्या नावेत ठेऊन अस्सी ते वरुणा अशी चक्कर मारून मग पंचगंगा घाटासमोर सांगितलेल्या ठिकाणी खोका सोडून द्या.

ठरलेल्या दिवशी राजघाट ते अस्सी घाट हा परिसर नागरिकांच्या अलोट गर्दीने फुलून गेला होता. पंचगंगा घाटावर तर मुंगीलाही जागा नव्हती इतकी गर्दी होती. आजपर्यंत काशीत कुठल्याही साधूने अश्याप्रकारे पूर्वसूचना देऊन जलसमाधी घेतली नव्हती.

पौष शुक्ल एकादशीचा दिवस उजाडला. स्वामीजींच्या सूचनेनुसार त्यांना संदुकीत ठेऊन पंचगंगा घाट ते अस्सी घाट ते राजघाट अशी नावेने परिक्रमा करण्यात आली. तद्नंतर पंचगंगा घाटावर ठरलेल्या जागी स्वामीजींना जलसमाधी देण्यात आली.

पंचगंगा घाटावर भट परिवाराचे घर आहे तेथे स्वामीजींनी स्थापना केलेले शिवलिंग व कालीमातेची मूर्ती आहे. नंतर तेथेच स्वामीजींच्या प्रतिमेची स्थापना करण्यात आली.

**ओं आप्यायन्तु ममांगानि, वाक् प्राणश्चक्षुः**
**श्रोत्रमथः बलनिन्द्रियाणिब्च सर्वाणि ।**
**सर्व ब्रम्होपनिषदं । मा ऽ हं बट्म निराकुर्या,**
**मा मा ब्रम्ह निराकरोदनिराकरणमस्तु**
**अनिराकरणं मेटस्तु । तदात्मानि निरते ये**
**उपनिषत्सु धर्मास्ते मयि संतु, ते मयि संतु ।**
**ॐ शांतिः शांतिः शांति ॥**

**माझे सर्व शरीर – वाक् प्राण, चक्षु, श्रोत, बल व सर्व इंद्रिय पुष्ट व्हावे. प्रत्येक वस्तु म्हणजे उपनिषदात प्रतिपादित केलेले ब्रम्ह होय. मी कधी ते ब्रम्ह नाकारु नये व त्या ब्रम्हानेही माझा अस्वीकार करू नये. मी व ब्रम्ह एकरूप होऊ दे. तादाम्य पाऊ दे. परमात्म्यात लीन पावलेल्या माझ्यात उपनिषद व धर्म प्रकाशमान होऊ दे, किंबहुना माझ्यातच ते प्रकट होऊ दे.**

**ॐ शांतिः शांतिः शांति ॥**



**ह्या लेखाबरोबरच तेलंग स्वामी ही लेख मालिका समाप्त होत आहे. आम्हाला खात्री आहे कि आमच्या वाचकांना ही लेखमाला बोधप्रद ठरली असावी. तेलंग स्वामींसारखे अवतारी पुरूष युगायुगातून एकदाच जन्म घेत असतात आणि मानवी जीवनाला एक नवी आशा तसेच नविन दिशा देऊन जात असतात. अशा चरित्रांवर भक्तांच्या मांदियाळींमध्ये चर्चा घडायला हव्यात. तसा एखादा मंच तयार करण्याचा रेकिब्रह्मा मासिकाच्या व्यवस्थापनाचा मानस आहे. त्यासंबंधी आपल्याला लवकरच कळवलं जाईल. – संपादक**



# अष्टावक्र गीता

(भाग ७) प्रकरण १

**अजित सर**

(सूत्र १५)

निःसंगो निष्क्रियोऽसि त्वं स्वप्रकाशो निरंजनः ।
अयमेव हि ते बंधः समाधिमनुतिष्ठसि ॥१५॥

**अर्थः** तू निःसंग किंवा विरक्त आहेस, तू निष्क्रिय आहेस, तू स्वप्रकाशी आहेस, तू निरंजन (निःष्कलंक) आहेस. परंतु याची जाणिव तुला नसल्याने तू ध्यान-समाधिसारख्या प्रक्रियांमध्ये बांधला गेलेला आहेस.

येथे अष्टावक्र जनकाला सांगत आहेत कि ज्या क्षणी तुला तुझ्या मूळ स्वरूपाची जाणीव होईल त्या क्षणी तुला कोठल्याही साधन प्रक्रियेची गरज राहणार नाही. आपण सातत्याने पाहत आहोत कि अष्टावक्र आपल्यातील साधकाला सांगत आहेत कि तुझे मन जे मानते तसाच तू अनुभव घेतोस. स्वतःला मुक्त न समजल्याने मुक्त होण्यासाठी तुझी धडपड चालू आहे.

(सूत्र १६)

त्वया व्याप्तमिदम् विश्वं त्वयि प्रोतं यथार्थतः ।
शुद्ध बुद्ध स्वरूपस्त्वं मा गमः क्षुद्रचित्तताम् ॥१६॥

**अर्थः** तू सर्व विश्वव्यापी आहेस. आणि सर्व विश्व तुझ्यातच व्याप्त आहे.
तू एक शुद्ध, बुद्ध चैतन्यस्वरूप आहेस. (आता) तू क्षुद्र मनाचा होऊ नकोस.

जसे एखाद्या दागिन्यामध्ये सुवर्ण व्याप्त असते तसेच विश्वाच्या कणाकणात तूच आहेस. जसे एखाद्या मातीच्या घटामध्ये मातीचे अस्तित्व असते तसेच साऱ्या विश्वाचे अस्तित्व तुझ्यामध्येच आहे. आता तू स्वतःच्या पूर्ण शुद्ध स्वरूपाला विसरून स्वतःला क्षुल्लक समजू नकोस. साधनेत ज्याला गुरू दीक्षेचा परिस स्पर्श झाला आहे त्याने आपले सामान्यत्व विसरायलाच हवे. ज्ञानी माणसाला स्वतःला अज्ञानी समजू नये. आज आपण पाहत आहोत कि दुष्ट माणसांचा प्रभाव जगात वाढलेल्या आभास होतोय. खरे म्हणजे, चांगल्या माणसांना आपल्या चांगुलपणाचा विसर पडला आहे त्यामुळे अशी परिथिती तयार झालेली आहे. स्वतःतील तेजाचा विसर पडलेला माणूस अंधारात चाचपडत फिरावा व ठोकर खात जगावा असेच काहीसे.

## (सूत्र १७)

## निरपेक्षो निर्विकारो निर्भरः शीतलाशयः ।
## अघातबुद्धिरक्षुब्धो भव चिन्मात्रवासनः ॥१७॥

**अर्थ:** तू निरपेक्ष आहेस, तू निर्विकार आहेस, तू निरूप आहेस, तू शितलतेचा संग्रह आहेस. तुझ्या गहनतेचा अंदाज येत नाही एवढा खोल आहेस, अतिबुद्धिमान, आणि अतिशय स्थिर आहेस. तू फक्त तुझ्या चैतन्याचा अनुभव घेत त्या चैतन्याचीच आस धर.

येथे अष्टावक्र आपल्या अमर्याद अशा अस्तित्वाची जाणिव आपल्याला करून देत आहेत. शीतलता हा तुझा स्वभाव आहे त्याचा अनुभव आपण करत नसल्याने आपण क्षुब्ध किंवा अस्थिर असल्याचा आभास अनुभवतोय व आपण तसेच आहोत अश्या भ्रमात जगत आहोत. आपल्या अस्तित्वाची अथांगता आपण विसरलो आहोत. आपण खरे म्हणजे कोठल्याच – बाह्य अथवा आंतरिक घटनांनी– अस्थिर होऊ शकत नाही.

## (सूत्र १८)

## साकारमनृतं विद्धि निराकारं तु निश्चलम् ।
## एततत्वोपदेशेन न पुनर्भवसंभवः ॥१८॥

**अर्थ:** हे समज कि ज्याला रूप आहे, जे साकार आहे तो आभास आहे आणि जे निरूप आहे, जे निराकार आहे ते शाश्वत आहे. ह्या अध्यात्मिक सत्याने तू जन्म मृत्युच्या चक्राचे भेदन करशील. तुला पुन्हा जन्म घ्यायचे कारणच उरणार नाही.

"ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या" हे जे वेदातले सूत्र आहे त्याचाच पुनरुच्चार अष्टावक्र येथे करत आहेत. येथे हे समजायला हवे कि साकार म्हणजे शरीर इत्यादि आणि निराकार म्हणजे आत्मा. आपल्या जन्म–मृत्युच्या चक्राचे मूळ कारण म्हणजे आपली स्वत:बद्द्लची कल्पना कि आपण म्हणजेच शरीर, मन इत्यादि. हे अज्ञान आहे आणि त्या अज्ञानाचा शेवट फक्त आपल्या स्वत:च्या मूळ स्वरूपाची ओळख पटल्याने होतो. आधुनिक जगामध्ये आपले हे भान गेल्यामुळे आपण दु:खात, अस्वस्थतेत, निराशेत जगत आहोत.

## (सूत्र १९)

## यथैवादर्शमध्यस्थे रूपेन्तः परितस्तु सः ।
## तथैवस्मिन शरीरेन्तः परितः परमेश्वरः ॥१९॥

**अर्थ:** जसे एखादा आरसा हा प्रतिमेसकट अथवा प्रतिमेशिवाय असतो तसेच तो दिव्य आत्मा शरीरासकट अथवा शरीराशिवायही असतो.

एखाद्या आरशामध्ये जसे आपले प्रतिबिंब दिसते त्यावेळेला आभास होतो कि प्रतिबिंब हे आरशाच्या अस्तित्वाचा भाग आहे. परंतु आपण आरशापासून दूर गेल्यावर लक्षात येते कि आपल्या प्रतिबिंबाशिवायसुद्धा आरशाला अस्तित्व असते. आरशाला त्याच्यात प्रतिबिंब आहे किंवा नाही याने काहीच फरक पडत नाही. तद्वतच आपल्या आत्म्यामध्ये शरीर, मन, बुद्धी, अहं, अंत:करण जरी असल्यासारखे भासले तरीही आत्म्याचे अस्तित्व त्यांच्यावरती अवलंबून नसते. आत्म्याच्या अस्तित्वात ह्या सर्वांचे पडलेले प्रतिबिंब हाच मुळात आभास आहे.

(सूत्र २०)

## एकं सर्वगतं व्योम बहिरन्तर्यथा घटे ।
## नित्यं निरंतरं ब्रह्म सर्वभूतगणे तथा ॥२०॥

**अर्थः** जसे ते सर्वव्यापी आकाश (तत्व) घटाच्या आत आणि बाहेरही असते, तसेच ते ब्रह्म सर्वव्यापी आहे, सर्व गोष्टींमध्ये सामावलेले असते.

घटाचे झाकण बंद केल्यावर आपल्याला असे वाटते कि घटामधील आकाश आणि घटाच्या बाहेरील वातावरणातील आकाश हे वेगळे आहे. परंतु ज्या क्षणी त्या घटाचे झाकण दूर केले कि आतील आणि बाहेरील आकाश असा भेद संपतो. मग द्वैतातून आपली समज अद्वैताकडे जाते.

## "आपले मत"

अशी कल्पना करा की तुम्ही भर उन्हात उभे आहात. खूप घाम फुटत आहे. तुम्हांला खूप तहान लागली आहे, पण कुठेही पाणी नाही. थोडी विश्रांति घेण्यासाठी आपण झाडाच्या सावलीत उभे आहात.

तेवढ्यात, समोर इमारतीच्या पहील्या मजल्यावर एक खिडकी उघडते आणि तुम्ही त्या व्यक्तीकडे पहाता. आपली अवस्था पाहून, ती व्यक्ती आपल्याला पाण्याची गरज असल्याचे, हाताने सूचीत करते. त्या व्यक्तीबद्दल आपले प्रथम मत काय होईल?

ही आपली पहिली प्रतिक्रिया असेल.

खाली येत असल्याचे आपल्याला सूचीत करीत ती व्यक्ती खिडकी बंद करते. आता पंधरा मिनिटे निघून गेली आहेत, परंतु कोणीही दार उघडत नाही आणि बाहेर येत नाही. त्या व्यक्तीबद्दल तुमच्या मनात आता काय विचार येतील?

ही आपली दुसरी प्रतिक्रिया असेल.

थोड्या वेळाने दार उघडून ती व्यक्ती बाहेर येते आणि म्हणते, "उशीर झाल्याबद्दल क्षमा करा, पण तुमची अवस्था पाहून मला वाटलं की तुम्हाला पाण्याएवजी, लिंबू पाणी द्यावे. म्हणून मला बाहेर येण्यास वेळ लागला."

आता त्या व्यक्तीबद्दल तुमच्या मनात काय विचार येतील?

कृपया लक्षात घ्या की अजूनही त्या व्यक्तीकडून आपणास पाणी किंवा लिंबूपाणी मिळालेले नाही, परंतु आपण त्या व्यक्तीबद्दल आधीच तीन मते तयार केली आहेत.

त्याच्या हातातून ग्लास घेत, आपण लिंबाच्या पाण्याचा पहीला घोट घेता. चव घेताच तुम्हांला कळतं की ते अत्यंत आंबट आहे आणि त्यात बिलकुल साखर नाही. आता त्या व्यक्तीबद्दल तुम्हाला काय वाटेल?

आंबट चवीमुळे आपल्याला विचित्र चेहरा करताना पाहून, तो खिशातून साखर पॅकेट काढून आपल्याकडे देतो. "कृपया आपल्याला पाहिजे तितकी साखर घाला." तो म्हणतो. आता त्याच व्यक्तीसाठी आपले असलेले मत बदलताना आपल्याला जाणवेल.

आपली मते किती पोकळ आहेत आणि अश्या छोटया छोटया आणि शुल्लक घटनांमध्ये सुध्दा, किती वारंवार ते बदलत राहतात हे लक्षात घेण्यासारखे आहे. हा किस्सा आपल्याला विचार करण्यास भाग पाडतो, आपंण एखाद्याबद्दल मत बांधण्यास देखील पात्र आहोत काय? सध्या जे आपल्या आवडीनुसार वागतात किंवा बोलतात, आपण त्यांना चांगल्या लोकांच्या श्रेणीत समजतो.

विचार आणि चिंतन करण्यास हा एक मनोरम विषय आहे. **रेकि साधक म्हणून आपण आपल्या जीवनात घडणाऱ्या सर्व घटना आणि येणाऱ्या सर्व माणसांप्रती आपले मत तटस्थ ठेवले पाहीजे.** आपल्या अस्तित्वाचा हेतू, कुणाबद्दल मत बनविणे नाही तरीही, आपल्यास समोरच्या व्यक्तीबद्दल मत ठेवायचेच असले तर ती एक चांगली व्यक्ती आहे आणि आपल्याच फायद्यासाठी आपल्या आयुष्यात आली आहे, असे विचार करणे किती सुंदर असेल. जर आपण असा विचार आपल्या मनात निर्माण केला तर समोरच्या व्यक्तीला आपली सकारात्मक उर्जा देखील मिळेल आणि आपल्या उपस्थितीबद्दल त्याला चांगले वाटेल. शब्दाद्वारे बोलण्याआधीच, दोन लोकांची आभामंडळे विचाराद्वारे जोडले जात असतात. म्हणून **सकारात्मक रहा, सतर्क रहा, आणि प्रत्येक क्षणाला सावध रहा.**

संकलकः चंद्रेश परमार, वडोदरा.



(लेखांक १९)

# जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

आतापर्यंत आपण स्वामींच्या काळातील घडलेल्या व्याधी निवारणाच्या काही सत्य घटना पाहील्या. आता ह्या अंकात मी अशा घटनेचा उल्लेख करत आहे जी आताच्या काळात घडलेली आणि ज्या व्यक्तीच्या बाबत घडलेली त्या व्यक्तीने स्वत: मला सांगितलेली. ही व्यक्ती आजही हयात आहे आणि केवळ त्यांना ही घटना लोकांसमोर आणू का अशी परवानगी न घेता आल्याने मी त्यांचे नांव जाहीर न करता आपण वाचकांसमोर मांडत आहे.

गोष्ट साधारण १९५३ची. म्हणजे आज त्याला जवळ जवळ ७० वर्षे उलटलेली. हे गृहस्थ (त्यांना आपण बाबासाहेब म्हणू) त्यावेळी ते लहान होते म्हणजे विशीतले असावेत. ते मुंबईला खार भागात आपल्या आत्यासमवेत राहत होते. बाबासाहेब, त्यांची आत्या आणि त्या आत्यांचा मुलगा एवढेच कुटुंब. त्या काळातील खार म्हणजे मुंबई शहराच्या बाहेरचे एक उपनगरच मानले जायचे. त्यांच्या निवासापासून अगदी समुद्राच्या खाडीपर्यंत केवळ दलदलीची जमिन पसरलेली. वस्ती अगदीच नगण्य.

त्यांच्या आत्याला काहीतरी विकार जडला. बहुधा मधुमेह असावा. त्यात त्यांच्या पायाला काहीतरी जखम होऊन ती चिघळली. त्या काळात तसे डॉक्टरही फार नसायचे. जवळचेच उपनगर सांताक्रुझ. तेथे एक परूळेकर नावाचे डॉक्टर होते. त्यांचे उपचार चालू होते. परंतु परिस्थिती एवढी चिघळली कि डॉक्टरांनी एका सायंकाळी सांगितले कि आता आपल्याकडे आत्याचा तो पाय कापल्याशिवाय दुसरा पर्यायच नाही. आणि ही शल्यक्रिया तुरंत करावीच लागणार. झाले तो दिवस ठरला.

आत्याचा मुलगा आणि बाबासाहेब खूप निराश झाले. ते सगळेच कुटुंब तसे श्री स्वामी समर्थांच्या श्रद्धेतले. रात्रंदिन ह्या तिघांनाही तसा स्वामींचा ध्यास लागलेला. आता तसेही स्वामींशिवाय तारणारे कोणीच नाही. आत्याच्या मुलाने आत्याच्या शय्येसमोर बसून स्वामींचे नाव जपायला सुरूवात केली. बाबासाहेब विशितले त्यामुळे अर्थातच त्यांना काही सुचेना. आपल्या आत्याचा पाय उद्या इस्पितळात जाऊन कापावा लागणार ह्या कल्पनेचीच त्यांना भीति वाटायला लागली. त्यांची झोप उडाली. रात्रीचे दोन वाजले होते आणि बाबासाहेब एका आरामखुर्चीवर बाहेरच्या गॅलेरीत निराश मनाने बसले होते. आतमध्ये मोठ्यामोठ्याने आतेभावाच्या आर्तपणे म्हटलेल्या स्वामी कृपातीर्थ तारक मंत्राचे घोष चालले होते तेही बाबासाहेबांच्या कानावर पडत होते. सगळे वातावरण धुरकट झाले होते. थंडीच्या वातावरणातसुद्धा बाबासाहेबांना घाम फुटला होता. त्यांच्याही तोंडी स्वामींचे नाव स्मरले जात होते. हळूहळू रात्रीचा धूसरपणा वाढत चालला होता. सगळेच कसे उदास आणि गूढ जाणवत होते. अचानक बाबासाहेबांच्या कानावर कोणतरी मोठ्याने बोलत असल्याचा आवाज आला. रात्रीच्या शांततेत तो आवाज अधिकच मोठा वाटत होता. जणू काही कोणीतरी मोठ्याने ओरडत होते कोणावर तरी. मागोमाग काठीचा आवाज आला. बाबासाहेबांच्या लक्षात आले कि काहीतरी आतल्या खोलीत चालले आहे. ते घाबरूनच खोलीच्या दरवाज्यापाशी आले आणि त्यांनी जे दृश्य पाहीले ते अवर्णनीय, अतर्क्य असेच होते. ते सांगतानाही इतक्या वर्षांनंतर बाबासाहेबांच्या आवाजात कंप निर्माण झाला.

खोलीमध्ये प्रत्यक्ष स्वामी समर्थ उभे होते आणि त्यांच्या हातात एक मोठी काठी होती. ते ती काठी रागाने आपटत होते जमिनीवर आणि हवेतच कोणाकडे तरी बघत शिव्या घालत होते. खूप रागावले होते ते "त्या" अस्तित्वावर. बाबासाहेब जसे खोलीच्या दरवाजात आत यायचा प्रयत्न करू लागले. त्या क्षणी स्वामींची नजर त्यांच्यावर पडली व स्वामींनी त्यांच्यावर ओरडतच सांगितले, "तुम बीचमे मत आना" आणि स्वामींनी आपल्या लांब पायांनी त्यांच्या गुड्घ्याच्या बाजूला लाथ मारली. त्या लाथेचा तडाखा एवढा होता कि त्या लाथेची ती खूण सहा दशके उलटली (बाबासाहेबांनी ही कथा मला दहा वर्षांपूर्वी सांगितली होती) तरीही बाबासाहेबांच्या गुडघ्याशेजारी होती आणि अजूनही असावी.

बाबासाहेब आपला गुडघा आवळून तेथेच बसले व साक्षीभावाने पाहत राह्यले. स्वामींनी पुन्हा दोनदा काठी जोराने आपटली. स्वामींनी पुन्हा "त्या" अस्तित्वाला जोराने शिव्या दिल्या आणि म्हणाले, "निकल जाव". मग स्वामी थोडे शांत झाले आणि आत्याच्या मुलाला म्हणाले, "हे बघ, उगीच घाबरून रडू नकोस. काही होणार नाही तुझ्या आईला. एक काम कर. तुझ्या डॉक्टरांना म्हणावे ++++ नावाचे एक इंजेक्शन मिळते ते तुझ्या आईला ताबडतोब द्या. पाय कापायची गरज राहणार नाही." असे म्हणून स्वामी अदृश्य झाले. तोपर्यंत साधारण रात्रीचे तीन–साडेतीन वाजले होते. बाबासाहेब व त्यांचा आतेभाऊ दोघेही त्या अवेळी सायकलवरून निघाले आणि सांताक्रुझला डॉ. परूळेकर यांच्या घरी गेले. त्यांना झोपेतून उठवून त्यांनी ते इंजेक्शन देण्याची विनंति केली. सुदैवाने डॉक्टरांनी ते मान्य केले. स्वत:च्या चारचाकीतून त्यांनी ह्या दोघांसमवेत आत्याच्या घरी येऊन इंजेक्शन दिले. स्वामींची कृपा येवढी प्रचंड कि आत्याबाई त्या विकारातून पूर्ण बऱ्या होऊन पुढे १३–१४ वर्षे जगल्या. "अशक्यही शक्य करतील स्वामी" आणि काय?

(अजित सरांना प्रत्यक्ष बाबासाहेबांनी सांगितलेल्या अनुभवावर आधारित)

# श्री स्वामीकृपेचा अनुभव

अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थांच्या कृपेचा आलेला अनुभव सांगण्यासाठी हा लेख लिहीत आहे.

आमच्या नातीचा जन्म ८ एप्रिल २००३ चा. जन्मताच ती खुप अशक्त होती. वजन वाढत नव्हते, त्यातच डोळ्यात दोष. चिपळूण जवळच्या डेरवण हॉस्पिटल मधील डॉक्टरनी तिला मुंबईच्या डॉक्टरांकडे न्यावयास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही मुंबईतील नामांकीत दवाखान्यात नेऊन तिची तपासणी करून घेतली. तेथील डॉक्टरांनी 'तिला घरी घेऊन जा काहीही उपयोग होणार नाही' असे सांगितले. घरी आल्यानंतर श्री स्वामींवर विश्वास ठेऊन ते जशी प्रेरणा देतील तसे घरगुती व आयुर्वेदिक उपचार करण्यास सुरुवात केली.

दिंडोरीतील अक्कलकोट स्वामींच्या मठातर्फे आमच्याकडे दर महीन्याला अंक येत असे त्याच्या वाचनाने आमची स्वामींवर श्रध्दा बसली.

आमच्या घरापासून जवळच ओझरे खुर्द येथे श्री. अजित तेलंग सरांनी अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थांचा मठ बांधला आहे. तेथे एक दिवस सौभाग्यवती व मुलगा दर्शनाला गेले असताना तेथे टेपरेकॉर्डरवर तारकमंत्र चालू होता. श्रीस्वामींना नमस्कार व प्रार्थना करून निघाले असताना पायऱ्या उतरत असताना कानावर शब्द पडले "अशक्य ही शक्य करतील स्वामी." हे ऐकून मनाला दिलासा मिळाला. श्रीस्वामीनी आपली प्रार्थना ऐकली आहे.

माझा मुलगा दर सोमवारी श्रीस्वामींचे मठात दर्शनाला जातो. त्याची श्रीस्वामींवर खूप श्रध्दा आहे. घरी वाचन जप करतो. त्याच्या मुलीची आज जी प्रगती झाली ती श्री स्वामी कृपेनेच यावर घरातील सर्वांचा विश्वास आहे. ती यावर्षी बारावीला आहे. दहावीला तिला ७७.४०% गुण मिळाले. आता पुढील प्रगती श्री स्वामींच्या कृपेने उत्तम होईल असा दृढ विश्वास आहे.

सध्या तिची प्रगती आरोग्याच्या दृष्टिने ७०% पर्यंत आहे ती स्वामी कृपेने १००% होईल असा विश्वास आहे. श्री स्वामींचे चरणी नतमस्तक होऊन हा लेख पूर्ण करतो.

**स्वामी भक्त**
**श्रीकृष्ण श्रीराम सरदेसाई आणि कुटुंबीय**
**देवरुख.**



# महिला आणि गर्भसंस्कारांची गरज

**सौ वंदना तेलंग**

आपल्या आयुष्यात ताणतणावाची सुरूवात कशी झाली हे तुम्ही सांगू शकाल काय? खरं तर आपण आलोअ त्याच क्षणापासून . कारण एक तर आपल्या आई–वडिलांना मुलगा हवा असतो आणि आपला जन्म झाला एका मुलीचा. सामान्यतः आई–वडील निराशेच्या गर्तेत जातात जरी ते चेहऱ्यावर उसना भाव आणून पहिली बेटी धनाची पेटी अशा घोषणा देऊन आपल्या निराशेला झाकायचा प्रयत्न करतात. मग ही मुलगी ह्या अशा वातावरणात वाढत जाते. बऱ्याच वेळेला तिला हे बोलून पण दाखवले जाते आणि आपण आपल्याच आई–वडीलांना नकोशे होतो ही विमनस्कता तिच्या आयुष्याचा चोळामेळा करून टाकतो. शेवटी हाच विचार तिच्या आयुष्याला वेगवेगळ्या वळणांतून घेऊन जात असतो. त्याला इंग्रजीमध्ये ड्रायव्हींग फोर्स म्हटले जाते. त्याच इंधनावर आणि सुकाणुवर तिच्या जीवनाची गाडी चालू राहते.

अशा वातावरणात वाढलेली मुलगी मग आयुष्याच्या वेगवेगळ्या परिस्थितींमधून जायला लागते. यौवनाच्या काळात तिच्या शरीराच्या प्रतिक्रीयाही अशाच सुरू होतात. आजकाल ज्याला पी.सी.ओ.डी. वगैरे विकार म्हणतात तो म्हणजे दुसरे काही नसून स्त्रीच्या शरीरात अवास्तव वाढणाऱ्या पुरूषी अंतस्त्रावाचा (होर्मोन्स) आविष्कार. अशा स्त्रियांचे अंतर्मन शरीराला सातत्याने सांगत असते कि मी स्त्री नाही, मी पुरूष आहे. पॉडेचरीच्या सुप्रसिद्ध सिद्ध विदुषी मदर आपल्या एका लेखात म्हणतात कि काही काळापर्यंत मानवी समाजात शुद्ध स्त्री आणि शुद्ध पुरूष असे नैसर्गिक विभाजन होते. परंतु वरील गोष्टींमुळे काही काळानंतर ह्या गोष्टीमध्ये दूषितता आली आणि आताचा हा समाज तयार झाला.

अशा अवस्थेतून मग ती मुलगी जीवनाच्या निरनिराळ्या भूमिकेतून जाऊ लागते. कधीतरी याच काळात तिचे लग्न होऊन ती नव्या घरात एक नवे अस्तित्व म्हणून प्रवेश करते. त्या नव्या घराच्या विचारसरणीशी तिला मिळते घ्यावे लागते. काही गोष्टी आपल्याला पटतात काही पटत नाहीत. इतकी वर्षे झालेली घुसमट, राग याचा कधी ना कधी भडका उडतो. त्यात आपला नवरा मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करतो. आई– वडिलांनी अजूनपर्यंत कळत नकळत् केलेले मानसिक आघात ती मुलगी आता नवऱ्यावर आणि सासरच्या माणसांवर राग काढून चुकते करायचा प्रयत्न करते. हा ताण तणाव खूप वाढला कि एकतर ती घर सोडून निघून जाते किंवा आत्मघात करून घेते. यासाठीच गर्भामध्येच गर्भसंस्कार होऊन ती मुलगी आनंदी राहील हे पाहणे फार आवश्यक आहे. आज संसाराची आणि समाजाची राखरांगोळी होण्यात या सर्व गोष्टी फार महत्वाच्या आहेत. एका स्त्रीचे ताण तणावातून मुक्त होणे समाजाच्या कल्याणासाठी फारच आवश्यक आहे हे निश्चित.



रेकि शिबिरातील बोधकथा (५२)

# एक दिवसाचा देव..

एका देवळामध्ये देवळाची सफाई करणारा एक सेवक होता. तो तेथे कित्येक वर्षे ही सेवा करत असे. सकाळपासून रात्रीपर्यंत तो देवळाच्या परिसरातच असे. देवाकडे येणारे व साकडे घालणारे भक्त तो सातत्याने पाहत असे. आपापली दु:खे येणारे भक्त आर्तपणे देवाला सांगायचे. कोणाचे काय आणि कोणाचे काय.. प्रत्येकाचे दु:ख वेगळे, प्रत्येकाचे संकट वेगळे. पण आर्तता मात्र तेवढीच. आणि हे सगळे तो देव शांतपणे ऐकून घ्यायचा. एवढ्या लोकांची दु:खे ऐकून घेणारा देव वर्षानुवर्षे एकाच जागेवर राहून केवढा थकला असेल असे त्या सेवकाला नेहमी वाटे. तो जरी प्रत्यक्ष परमेश्वर असला तरीही त्याला विश्रांतिची गरज असते असे त्याला नेहमी वाटे. परंतु करायचे काय? हा प्रश्न त्याच्या मनात नेहमीच यायचा.

एके दिवशी रात्रीच्या वेळेला मंदिरात गर्दी ओसरली होती. आणि देव शांतपणे आपल्या जागेवर उभे होते. मंदिरात कोणीच नाही असे पाहून त्या सेवकाला वाटले कि ही संधी आता बरी आहे परमेश्वराशी बोलायची. त्याने देवासमोर जाऊन हात जोडले आणि तो आर्ततेने म्हणाला, “देवा, किती रे तू सहन करतोस? सगळ्यांची दु:खे ऐकून, त्यांच्या वेदना पाहून तुला खूप थकवा आला असेल नाही? एक दिवस तरी आराम कर रे बाबा.” असे म्हणतच त्याने देवाला विनवणी केली कि उद्याचा दिवस तरी तू आराम कर. तुझ्या बदली मी तुझ्यासारखा वेष करून उभा राहीन. फक्त ऐकायचेच तर काम करायचे आहे.

देवाला त्याची ही आर्त प्रार्थना भावली खरी आणि त्याची कल्पनाही आवडली. पण देव त्याला सावध करत म्हणाले, “अरे बाळा, हे बघ माझ्यासारखे नुसते उभे राहून निर्विकारपणे लोकांच्या याचना, प्रार्थना शांतपणे ऐकणे जमेल का रे तुला? हे वाटते तेव्हढे सोपे नाही.” पण तो गृहस्थ तर जिद्दीलाच पेटला आणि म्हणाला, “देवा, एक दिवस तरी मला हे करू दे ना. तेवढीच माझ्या हातून तुझी सेवा घडेल.” देव हसला आणि म्हणाला, “बरे तर, ठीक आहे. एकच दिवस करून पाहूया. पण एक वचन दे कि तू लोकांच्या प्रार्थनेला काहीच प्रतिसाद द्यायचा नाही. केवळ माझ्यासारखे मूकपणाने उभे राह्यचे.” त्या माणसाने देवाला चक्क वचनच दिले तसे. त्याला वाटले कि काही न करणे आणि काहीच न बोलणे केवढे सोपे आहे, काहीतरी करायला प्रयत्न करावे लागतात. पण काही न करण्याला काहीच प्रयास नाहीत. मग देवाचे आणि त्या माणसाचे ठरले कि आता उद्या सकाळपासून आपल्या भूमिकांची अदला बदल करायची. पहाटेच्या काकड आरतीच्या आधीच पुजारी यायच्या आधीच देवाची जागा त्या माणसाने घ्यायची आणि रात्रीची शेजारति झाल्याबरोबर पुन्हा देवाने आपल्या जागेवर उभे राह्यचे म्हणजे कोणाला काहीच कळायचे नाही.

दुसरा दिवस उजाडला तोच मुळी त्या माणसाच्या देवाच्या जागी उभा राह्यण्याने. देवाने त्याला छान सजवले आपल्यासारखाच हुबेहुब. आणि त्याला शुभेच्छा देत देवाने पुन्हा बजावले कि बघ,

काहीही झाले तरी आपले तोंड उघडायचे नाही, प्रतिसाद द्यायचा नाही. मी बाकी सगळे सांभाळून घेईन. पुजारी येऊन त्यांनी साग्र संगीत पुजा केली. त्याला काही पत्ताच लागला नाही एवढे हुबेहुब सोंग त्या माणसाने देवाचे आणले होते. त्यानंतर मंदिरात लोकांची गर्दी जमू लागली. भक्तांच्या आळवण्या सुरू झाल्या. भक्त आर्ततेने देवाची प्रार्थना करत होते. एकेकाच्या दु:खभऱ्या व्यथा ऐकून त्या माणसाला अनावर होत होते. परंतु देवाने वारंवार सांगितल्याने आपण कोठलीही प्रतिक्रिया द्यायची नाही यावर तो ठाम होता. दुपारच्या वेळी देवळात तशी सामसूम होती. तेवढ्यात एक भक्तगण घाईघाईत आला. गळ्यातल्या सोन्याच्या माळा, हातातल्या आंगठ्या त्याच्या संपन्नतेची साक्ष देत होत्या. देवासमोर तो भक्तीभावाने वाकायला गेला आणि त्याच्या लक्षात आले कि आपल्या विजारीच्या खिशात पैशाने गच्च भरलेले पाकीट आहे. त्याने ते काढून देवाच्या बाजूला असलेल्या एका चौरंगावर ठेवले आणि तो नमस्कार करून पाकीट विसरून निघून गेला. त्यानंतर काही क्षणांतच एक बोटीवर कामाला असलेला खलाशी तेथे पोहोचला. तो फार प्रामाणिक होता. देवासमोर नमस्कार केल्यानंतर त्याच्या लक्षात येते कि कोणीतरी पैशाचे पाकीट देवळात विसरून गेले आहे. तो ते पाकीट तेथेच ठेवतो व निघून जातो. त्याच्या ह्या प्रामाणिकपणाने देव बनून उभ्या असलेल्या त्या माणसाला खूप गहिवरून येते. काही काळानंतर आणखी एक गृहस्थ देवदर्शनाला येतो. तो तसा गरीब असतो आणि पैशाच्या अडचणीत असतो. तो देवासमोर करूणा भाकतो आणि अचानक त्याला पैशाने भरलेले पाकीट तेथे दिसते. त्याला वाटते कि आपली प्रार्थना ऐकून देवानेच हा काहीतरी चमत्कार केला असावा. तो ते पाकीट खिशात टाकून निघून जातो. त्याच्या ह्या कृतिने देवरूपी माणसाला खूप राग येतो. पण काय करायचे. आपण फक्त साक्षिभावाने हा खेळ बघायचा म्हणून तो राग गिळून टाकतो.

ज्याने ते पाकीट विसरले असते त्या माणसाला घरी पोहोचल्यावर लक्षात येते कि आपले पाकीट आपण देवळात विसरलो आहोत. तेथे येऊन पाहतो तो पाकीट गायब. त्याला आता आठवते कि आपण घाईघाईत मंदिराबाहेर पडत असताना, एक माणूस देवळात शिरत होता. त्यानेच ते पाकीट घेतले असावे. तो नजिकच्या पोलीस ठाण्यावर जाऊन त्यांना ह्या घटनेची माहिती देतो व संशयिताचे वर्णन सांगतो. काही मिनिटातच पोलीस त्याला अटक करून ठाण्यावर घेऊन येतात व गुन्ह्याच्या ठिकाणीही म्हणजे देवळात आणतात. पोलीसांबरोबर आलेल्या त्या माणसाला पाहून देव बनलेल्या सेवेकऱ्याला आठवतो तो त्याचा प्रामाणिकपणा. पण लक्षात येते कि आता पोलीस त्याच्याकडे संशयित म्हणून पाहत आहेत, आता मात्र त्याला खरोखरच खूप राग येतो. आणि आपली भूमिका विसरून तो चक्क तोंड उघडतो आणि पोलिसांना सांगतो कि तो माणूस गुन्हेगार नसून त्याच्यानंतर आलेल्या माणसाने पाकीट पळवले आहे. झाले पोलिस त्याला सोडतात आणि तो माणुस खुश होऊन परत आपल्या बोटीवर जातो.

त्या रात्री शेजारतिनंतर देवळातील देव आपली जागा पुन्हा घेतो व त्या माणसाला विचारतो कि त्याचा अनुभव कसा होता. तो माणुस भारावलेल्या मनाने सगळे काही सांगतो. देव हळुच त्याला विचारतो, “तू मध्ये काही बोललास वगैरे नाही ना?” तो माणुस ओशाळलेल्या मनाने म्हणतो, “तसे फार नाही बोललो, पण एकदा मात्र मला राहवले नाही. एका माणसावर अन्याय होत होता तो थांबवण्यासाठी मला माझे मौन सोडावे लागले.” ही सगळी कथा ऐकून देव कपाळावर हात मारतो आणि म्हणतो, “बाप रे! हे काय केलेस तू? अरे, ही परिस्थिती तर मी मुद्दाम तयार केली होती. जेणेकरून तो सालस खलाशी एक दिवस तुरूंगात घालवेल आणि आपल्या बोटीपासून दूर राहील. कारण आजच्या दिवशी त्याच्या बोटीचे वादळात बुडणे क्रमप्राप्त होते. आज तो आता तुरूंगात नसल्याने बोटीवर गेला असेल आणि बोटीबरोबरच बुडाला असेल. म्हणून तुला मी सांगून गेलो होतो कि काहीही झाले तरी बोलू नकोस. माझ्या योजनेचा तू पूर्ण चुराडा केलास. आता मलाच हे सर्व निस्तरायला लागेल.”

**तात्पर्य: मानवाची समज ही फार तोकडी असते. देवाची योजना त्याला लक्षातच येत नाही.**

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान

**लेखांक १३वा**

**अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे**



## 'ओजसचे सामर्थ्य'

योगी लोक नेहमी सांगतात की, लैंगिक कृतीसाठी वा लैंगिक विचारासाठी जी मानवी उर्जा खर्च होते, ती जर नियंत्रित केली, तर तीच उर्जा सहजपणे ओजस मध्ये रुपांतरीत होते. असा ओजस शरीरात साठविला जातो. जेवढा ओजस जास्त तेवढा मनुष्य अधिक प्रतिभावान, सामर्थ्यवान. बौध्दिक आणि आध्यात्मिकदृष्टया अधिक प्रगल्भ अन सक्षम बनतो.

एखादा मनुष्य खूप अलंकारीक भाषा आणि भव्य दिव्य विचार आपल्यासमोर मांडतो, परंतु तरी ते आपल्यावर फारसा प्रभाव पाडु शकत नाहीत, आपल्यावर मोठा परिणाम साधु शकत नाहीत. अन दुसरा एखादा मनुष्य अगदी साधे सोपे बोल बोलतो, सहज सोपे विचार आपल्यापुढे ठेवतो, पण त्याचे शब्द मात्र आपल्याला जणु मोहिनी घालतात. त्याच्या शब्दांचे अन विचारांचे गारूड आपल्याला झपाटल्यासारखे भारावून टाकते. त्याची प्रत्येक हालचाल आपल्याला प्रेरणादायक वाटते. हीच ओजसची शक्ती आहे.

ब्रम्हचर्य म्हणूनच म्हत्वाचे आहे. त्याला अध्यात्मात अनन्यसाधारण महत्व दिले गेले आहे ते एवढ्यासाठीच. तो एक महत्वाचा गुण मानला गेला आहे. अंतर्बाह्य पवित्रता सांभाळणाऱ्या मनुष्यामधेच ओजस साठतो, वाढतो वृध्दिंगत होतो. जगतातील सर्व धर्मांमधे ब्रम्हचर्य (अंतर्बाह्य पावित्र) म्हणूनच सांगितले गेले आहे. जगातील नाना धर्म आणि पंथ यातील सर्वच महान संत, महंत, यांनी सातत्याने ब्रम्हचर्य पालन केल्याचे आपल्याला दिसून येईल.

या ब्रम्हचर्याचे (अंतर्बाह्य पावित्र्याचे) पालन तीन पातळीवर करणे गरजेचे आहे – विचार, शब्द आणि कृती.

## शिकण्याचे गुपित

### (एकपाठी गुणाचे कौशल्य)

बेलूर मठात काही दिवसांपूर्वी ब्रिटानिका विश्वकोशाचा नविन खंड विकत घेण्यात आला होता. त्या जाडजुड कोऱ्या करकरीत, चमकणाऱ्या पुस्तकाकडे पाहून शिष्य स्वामीजींना म्हणाला, "एकाच आयुष्यात ही सगळी पुस्तके वाचणे जवळजवळ अशक्य आहे, नाही का?"

स्वामीजींनी आधीचे दहा खंड कधीच वाचून पूर्ण केले आहेत अन अकराव्या खंडाचे वाचन सुरु केले आहे, याची त्या शिष्याला कल्पना नव्हती.

**स्वामीजी:** असे का म्हणतोस? या दहा खंडामधून तुला पाहीजे ते विचार मला. मी सर्वांना तू विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देईन.

शिष्याने महत आश्चर्यचकीतपणे विचारले, "तुम्ही खरचं हे सर्व जाडजुड खंड वाचले आहेत का?"

**स्वामीजी:** अर्थातच. नाहीतर मला प्रश्न विचार असे मी का म्हणालो असतो?

नंतर त्या शिष्याने खरोखरच वेगवेगळ्या खंडामधून स्वामीजींना काही प्रश्न विचारले. अन आश्चर्याची गोष्ट म्हणजे स्वामीजींनी त्याच्या प्रश्नाची उत्तरे तर दिलीच पण काही ठिकाणी तर

विश्वकोषामधे वापरलेली कठिण भाषा जशीच्या तशी सांगितली. हे पाहून सर्वच जण आश्चर्यचकीत झाले.

**शिष्य:** "हे सामान्य माणसाच्या अवाक्याबाहेरचे आहे असे मला वाटते."

**स्वामीजी:** सातत्याने अन काटेकोरपणे आत्मसंयमान (ब्रम्हचर्य) पालन केल्याने खूप कमी वेळात तुम्ही सर्व शिक्षण प्राप्त करून घेऊ शकता. केवळ एकदाच ऐकलेले किंवा सांगितलेले तुम्हांला कायमचे लक्षात रहाते.

## मनाच्या शक्तीचे रहस्य

राजयोगाचे विज्ञान आपल्याला निरिक्षण करण्यासाठी महत्वाचे अन एकमेव साधन देते, ते म्हणजे 'आपले मन'. मनानेच मनाचे विश्लेषण करायचे आहे. पण त्यासाठी एकाग्रता हवी. एखाद्या गोष्टीकडे लक्ष देण्याची ही शक्ती, योग्य मार्गदर्शनाद्वारे मनाची एकाग्रता साधून मनाचे विश्लेषण करू शकते. अन त्याद्वारे मग आपल्याला सत्य गवसते. आपल्या समोर सत्य प्रगट होते. मन हे प्रकाशाच्या वा सूर्याच्या किरणासारखे असते. ते विखुरलेले असतील तर फारसा परिणाम साधू शकत नाहीत. पण ते जर एकाग्र, एकवटलेले असतील तर ते मोठा परिणाम साधतात. सारे अस्तित्व प्रकाशमान करतात. ज्ञान मिळविण्याचे हे आमचे एकमेव साधन आहे.

एकदा का आपल्याला ही गुरुकिल्ली मिळाली की आपल्या समोर विश्वातील सारी रहस्ये उलगडतात. आपल्याला हे माहीती पाहीजे की कोणती कळ दाबायची अन मनाची कवाडं कशी उघडायची. त्यातून लागणारा जोर आणि ताकद मनाच्या एकाग्रतेतून प्राप्त होते. मनाची शक्ती कल्पनातित आहे, अमर्यादित आहे. जेवढी जास्त एकाग्रता, तेवढी अधिक मनाची शक्ती. बस्स! इतकेच गुपित आहे.

# अग्निहोत्र

सौ भाग्यश्री पुरोहित, नाशिक

अहंकाराच्या शेणीवर सोड
साधनेची धार,
पेटव अग्नी निर्धुम,
जाळून टाक संस्कार ।

शुध्दतेच्या कसोटीवर
उतरवून घे सोनं,
आपसूक येतील थाऱ्यावर
भरकटलेली मनं ।

चिमूटभर लाल तांदळाला
तुपाने घे माखून,
खंडित नसावा तांदूळ
नीट घे पारखून ।

अरुणोदय अस्ताची वेळ
अचूकपणे साध,
त्रैंगुलीच्या चिमटीने
आहुती त्यात टाक ।

अखंड तांदुळासारखेच
व्रत अखंड चालू ठेव,
स्वर्ग सोडून खाली
का नाही येणार देव !!!



# आश्रम वार्ता

## १. महाशिवरात्री २०२१

महाशिवरात्री हा मठाचा एक महत्वाचा सण ज्याची वाट वर्षभर मठाशी संबंधित साधक व इतर स्वामीभक्त चातकासारखी पाहत असतात. ह्या वेळची महाशिवरात्री मात्र करोनाच्या ग्रहणाच्या वेधछायेमध्ये थोडीशी कमी प्रमाणावरच साजरी केली गेली. ९ ते ११मार्च या काळात महाशिवरात्रीचा उत्सव देवरूख मठात साजरा केला गेला. अनुष्ठान केलेले प्रमुख सेवेकरी, केंद्रांतून आलेले नियमित सेवेकरी आणि मर्यादित स्थानिक साधक अशा तीन गटांसाठी मठ या दिवसांत खुला ठेवला गेला. दर दिवशी रूद्र पठनाची तीन सत्रे व तशीच महामृत्युंजय मंत्राच्या उपासनेची तीन सत्रे अशी एकंदरीत अठरा सत्रे आयोजित केली होती. एका वेळी मठाच्या परिसरात ४०–४५ पेक्षा जास्त साधकांनी असू नये हा नियम काटेकोरपणे पाळला जात होता. मुखवटे व सॅनिटायझरचा सातत्याने वापर इत्यादि काळजी मठ व्यवस्थापनाने छान घेतली होती. ११ तारखेच्या रात्री झालेला शिव सत्संग, मध्यरात्रीची शिवस्थानावरची आरति व रूद्र पठण साधकांना एका वेगळ्याच भावविश्वात घेऊन गेला. वेगवेगळ्या केंद्रांतील साधक कोरोना नियमांमुळे मठात येऊ न शकल्याने बहुतेक केंद्रांमध्ये हाच कार्यक्रम साधकांनी आपापल्या घरी राहूनच साजरा केला. देवरूख मठातील कार्यक्रम झूमद्वारे प्रक्षेपित केल्यामुळे बऱ्याच साधकांना आपण देवरूखला पोहोचू शकलो नाही याची फारशी खंत राहीली नाही.





## २. विश्व अग्निहोत्र दिन १२ मार्च २०२१

या वर्षी महाशिवरात्रीच्या दुसऱ्याच दिवशी विश्व अग्निहोत्र दिवस आल्याने देवरूख मठात आलेल्या साधकांना ह्या उत्सवाचाही लाभ घेता आला. जेवढी वर्षे अग्निहोत्राच्या पुनर्स्थापनेला झाली तेवढी अग्निहोत्रे ह्या दिवसाच्या सायंकाळी करायचा नेम मात्र कोरोना नियमांमुळे या वर्षी पुरा होऊ शकला नाही. जास्तीत जास्त 46 लोकांनी मठात सायंकाळच्या अग्निहोत्राला उपस्थित राहवे या सूचनेमुळे 46 अग्निहोत्र पात्रांतून अग्निहोत्र चेतवले गेले.







## ३. मठाचा २१वा वर्धापन दिन उत्सव

१५ मार्च हा तर मठाचा वर्धापनदिन. आणि २०२१ म्हणजे मठाच्या २१ वर्षांच्या प्रवासाची पूर्ति. या वर्षी हा दिवस थाटामाटात करण्याचा विचार कोरोनाने सुरूंग लावल्याने प्रत्यक्षात येऊ घातला नाही. तरीही मठात या दिवशी नेहमीप्रमाणे उदक शांति, स्वामी पादुकांवरचा रूद्राभिषेक, स्वामींवरील श्री गुरू यतिवर ह्या प्रार्थनेवरील उपासना कवच, श्री स्वामी समर्थ सप्तशतिचे सामूहीक पठण, अप्रतिम पालखी सोहळा आणि दिवसा अखेरचा रंगलेला सत्संग असा भरगच्च कार्यक्रम सादर केला गेला.








## ४. वडोदऱ्यातील विश्व अग्निहोत्र दिवस समारोह

वडोदऱ्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गोसेवा गतिविधी या संस्थेच्या वतीने त्रिनेत्रेश्वर मंदिर येथे अग्निहोत्र आणि वेदीक होळी असा समारोह १२ मार्च २०२१ रोजी साजरा केला गेला. त्यात रेकि विद्या निकेतनच्या वीस साधकांनी भाग घेतला. श्री आशिष मुळे या आपल्या साधकाने श्री विवेक पांडे, संगिताताई, मृणालताई, मंजुबेन आणि इतर ज्येष्ठ साधकांच्या मदतीने अग्निहोत्रावर प्रेझेंटेशन केले. त्यानंतर सामुहीक सायं अग्निहोत्र करून सभेची सांगता झाली.



# आश्रम स्पंदन




गुरुगीतेतील अठ्ठाविसाव्या श्लोकात भगवान महादेव गुरूमहिमा वर्णन करत असताना श्री देवी पार्वतीला सांगतात,

**कर्मणा मनसा वाचा नित्यमाराधयेतगुरूम ।**
**दीर्घदंड नमस्कृत्यं निर्लज्जौ गुरूसन्निधौ ॥**

याचाच अर्थ, आपले कर्म, मन, वाणी यांच्या द्वारे शिष्यांनी गुरूची नेहमी उपासना करावी. गुरूसमोर लज्जा न बाळगता सरळ साष्टांग नमस्कार करावा.

ह्या वाक्यातील **"निर्लज्जौ गुरूसन्निधौ"** हे वचन स्वामी समर्थ बऱ्याचवेळेला उच्चारायचे असे त्यांच्या चरित्रात वर्णिले आहे. ह्या एका वाक्यात गुरूसमोर शिष्याने कसे वागावे याचे सार सामावले आहे. गुरू आणि शिष्य हे एक अतिशय आगळे वेगळे असे नाते आहे. असे मानले जाते कि दीक्षेच्या वेळी गुरू आपल्या अस्तित्वाचा एक अंश आपल्या शिष्याच्या अस्तित्वात उतरवतात. याचाच अर्थ असा आहे कि गुरु आणि शिष्य हे नाते तसे अतिशय पवित्र. ह्याचाच अर्थ असा कि तसे पहाता गुरु आणि शिष्य ह्यांचे अस्तित्व तसे वेगळे नसतेच मुळी. शिष्याच्या अस्तित्वाशी गुरु जणू स्वतःला बांधून घेतो. जन्मदात्री आई आपल्या अस्तित्वातून मुलाला जन्म देऊन आपला अंश आपला मुलात उतरवते तर गुरु जीवनामधेच आपल्या अस्तित्वाचा अंश आपल्या शिष्यात उतरवतो. म्हणजे तसे पहाता हे नाते आई–मुलाच्या नात्या इतकेच पवित्र आणि उदात्त. परंतु आई जेव्हा मुलाला जन्म देते तेव्हा हाच मुलगा आपल्या वाट्याला येईल ह्याची जाणीव तिला नसते, मुलाच्या सद्गुण–दुर्गुणांविषयी तिला काही कल्पना नसते. तिचे मुलाला जन्म देणे हे तसे थोडेसे अनभिज्ञतेतूनच होत असते. गुरु मात्र आपल्या शिष्याचे सर्व गुण–दोष जाणून त्याला स्वीकारतो. ह्याच कारणामुळे गुरु–शिष्यांच्या नात्याला एक आगळा पैलू प्राप्त होतो.

शिष्याच्या अस्तित्वामधे स्वतःच्या अस्तित्वाचा अंश सम्मीलित करुन गुरु शिष्याच्या साऱ्या आयुष्याची जबाबदारी स्विकारतो हे खरे. परंतु हे केव्हा उचित ठरते कि जेव्हा शिष्य हे नाते ही जबाबदारी केवळ एकतर्फी नसते. आपल्या अस्तित्वाच्या मुक्तीसाठी हे नाते अतिशय प्रभावी साधन आहे ही जाणीव शिष्याला असणे आवश्यक आहे. एकदा आश्रमात अशीच चर्चा चालली असताना कोणीतरी विचारले कि आजकाल पूर्वीसारखे गुरु का नाही तयार होत? का नाही दिसत समाजामधे! ह्या प्रश्नांचे उत्तर केवळ प्रतिप्रश्नानेच देता येते. आजकाल पूर्वीसारखे शिष्य कोठे आहेत? गुरुवर पूर्ण श्रद्धा ठेऊन स्वतःचे आयुष्य झोकून देणारे कोठे आहेत? पूर्वीच्या काळी असे होते कि वयाच्या सातव्या–आठव्या वर्षापर्यंत मुले आई–वडिलांच्या नजरेखाली वाढायची. ज्या वयात आई–वडिल आपल्या आचरणांनी, संस्कारांनी मुलांवर सुसंस्कार घडवायचे. परंतु त्यानंतरची त्याची १२ वर्षे गुरूंच्या समोर आश्रमातील पवित्र वातावरणामध्ये जायची. त्याची जडण घडण करण्यासाठी गुरूंना तेवढा अवधि मिळायचा. गुरू त्याच्या शिष्याच्या पूर्ण जडण घडणीचा साक्षीदार असायचे. शिष्याला भटकण्याच्या संधी कमी असायच्या. गुरूकुलामध्ये आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला कठोर परिश्रम करायला लागायचे; मग तो कोठल्याही घराण्यातून आलेला असो. अगदी राजघराण्यातून आलेल्या किंवा परमेश्वरी अवतार असलेल्या राम आणि कृष्णा सारख्यांना सुद्धा पाच घरी जावून भिक्षा मागणे चुकायचे नाही. या सगळ्या मागचा उद्देश विद्यार्थ्यांचा अहंकार त्याच वयात गळून पडावा असाच होता. मग अहंकार विरहीत असा हा शिष्य आपल्या ज्ञानाने जगाला ललामभूत व्हायचा. अहंकार हा माणसाचा सगळ्यात मोठा कपडा. तो धारण करून आपल्या वाईटपणाला लपवण्याचा प्रकार मग घडायचाच नाही.

निर्लज्ज म्हणजे लज्जाहीन नव्हे. तर एखाद्या लहान बालकाने आपल्या वस्त्रांशिवाय जसे आपल्या आईसमोर उभे रहावे एवढी निरागसता. ज्या आईने जन्म दिला तिच्या पासून बालक काय लपवून ठेवू शकतो? हे केवळ शारीरिक नव्हे तर आपल्या अस्तित्वातील कोठलीच गोष्ट आपल्या गुरूंपासून लपवून ठेवू नये हा त्यातील मूळ उद्देश. तसे पाहता गुरू तर आपल्या शिष्याला अंतर्बाह्य जाणत असतो, त्यापासून लपवायचे काय काय? पण आपले गुरू सगळंच जाणतात ह्या समज असल्याने कोठलाही मुखवटा न चढवता जसे आहोत तसे गुरूंसमोर उभे ठाकायचे हीच त्यामागील भूमिका. पण आजकाल आपण हे पाहतो कि आपण गुरूंना मॅनेज करू शकतो ह्या विचाराने बरेच जण गुरूंच्या सामोरे जातात. हे तर निव्वळ ढोंग ज्याने गुरू काही फसत नाहीत परंतु अंतिमतः नुकसान मात्र शिष्याचेच होत असते.

स्वामींचा आवडता शिष्य बाळाप्पा महाराज तसे श्रीमंत घराण्यातले. परंतु त्यांनी वैराग्यामुळे आपल्या संसाराचा त्याग केला आणि स्वामींच्या सेवेत दाखल झाले. परंतु मुळचा पिंडच धनवान घराण्यातला असल्यामुळे काही कामे करायला– जसे झाडू काढणे, भांडी धुणे वगैरे त्यांना कमी पणाचे वाटायचे. त्यांना या अशा कामाची एकतर सवय नसायची व अशी कामे करण्याची त्यांना लाज वाटायची. एकदा स्वामी समर्थांनी हे पाहील्यानंतर त्यांनी बाळाप्पांना उद्देशून हे वाक्य म्हटले आणि त्या क्षणी बाळाप्पांना अशी कामे करण्याची आवडही निर्माण झाली. प्रत्येक काम हे आवडीने केले तर ते चांगले असते आणि नावडीने केले तर वाईट असते. काम कधीच चांगले वाईट नसते. आपण त्या कामाकडे कसे पाहतो हे महत्वाचे असते. आपल्या स्वतःच्या धारणा, संस्कार, मतप्रणाली या गोष्टी ठरवितात कि काम चांगले असते का वाईट. आणि एकदा का मनाने ते काम वाईट ठरविले कि मग ते काम करायची लाज वाटायला लागते. त्यामुळे ह्या अश्या लज्जेच्या मागे कामाकडे आपण कसे बघत आहोत हे मूळ कारण असते.

स्वामींचे हे वाक्य मुळात भगवान शिवाने देवी पार्वतीला सांगितलेल्या गुरुगीतेतील. येथे भगवान महादेव देवीला सांगतात कि गुरूसमोर काहीच लपवायचे नसते. कारण एकतर गुरूसमोर एखादी गोष्ट लपवण्याचा विचार हाच गुरूचा अपमान ठरू शकतो. तसेही गुरूंपासून काय लपू शकते? गुरु केवळ आपल्या शिष्यालाच नव्हे तर समस्त विश्वाला अंतर्बाह्य जाणत असतात. परंतु बऱ्याच वेळेला ते आपल्या शिष्यांना ते दाखवून देत नाहीत. गुरूंपासून काही लपून राहू शकते हा विचारसुद्धा गुरूंविषयीचे अज्ञान आहे. ते आपल्या गुरूंना एक सामान्य व्यक्ती समजतात. असे वाटणाऱ्या शिष्यांना शिष्य म्हणणे सुद्धा अवघड. सामान्यतः आपल्याला आपल्या दोषांची, कमजोरींची लाज वाटत असते परंतु त्या कमजोरी, ते दोष गुरूंसमोर जर उघडे केले नाहीत तर गुरू तरी त्या दोषांचे निवारण कसे करणार? एखाद्या आईसमोर जाताना लहान बाळ शरीरावर कपडे आहेत, नाहीत याची तमा बाळगत नाही तसेच काहीसे. आईसमोर बाळ काय लपवणार आणि त्याला लज्जा कसली? लपवायची प्रवृत्तीच मूळात मानवाच्या अहंकारातून येते, आणि जेथे अहंकार आहे तेथे तर गुरूच्या कृपेपासून शिष्य वंचित राहीला म्हणून समजा.

# आगामी उपक्रम: रेकि शिबिरे

| दिनांक | रेकि शिक्षक | केंद्र/स्थान | श्रेणी | नोंदणीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| ३ व ४ एप्रिल | अजित सर | मुंबई | १ ली | अर्चना पाटील (९८२०३७०४६९) |
| ३ व ४ एप्रिल | कल्पिता कीर | देवरुख | १ ली | सुगंधा हेगशेट्ये (९४२२००२६०८) |
| १० व ११ एप्रिल | अजित सर | ठाणे | १ ली | गिरीश कर्णिक (९८२०२६०२२९) |
| १० व ११ एप्रिल | राकेश कुमार | एरोली | १ ली | गिरीश कर्णिक (९८२०२६०२२९) |
| १० व ११ एप्रिल | विशाल श्रीधनकर | रत्नागिरी | १ ली | भास्कर गाडगीळ (९४२२५०५५६६) |
| १० व ११ एप्रिल | कृपा चोक्सी | बडोदा | १ ली | चंद्रेशभाई परमार (९९७४७०१२००) |
| १७ व १८ एप्रिल | अजित सर | पुणे | २ री | अमृत कीरपेकर (९९६०१०१०१८) |
| १७ व १८ एप्रिल | कृपा चोक्सी | राजकोट | १ ली | ज्योति सरैय्या (९८२४२९९१५३) |
| २४ व २५ एप्रिल | भारतीबेन | अहमदाबाद | १ ली | किनल पंड्या (९७१४५१५८३९) |
| २४ व २५ एप्रिल | राकेश कुमार | नाशिक | १ ली | मोनाली राक्षे (९४२०६९२१३६) |